| | | |
|---|---|---|
| | पोलीस आयुक्त कार्यालय अमरावती शहर<br>ईमेलआयडी–cpamt@mahapolice.gov.in<br>फोन क्रमांक – 0721–22511000 | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

प्रेसनोट

## मा. पोलीस आयुक्तयांचे सि.आय.यु. पथक व पो.स्टे. गाडगे नगर यांचे शासनाकडुन प्रतिबंधीत असलेली "ई सिगारेट (वेप)" अंमली पदार्थाच्या कार्यवाहीबाबत

दि. 08/02/2024 रोजी मा. पोलीस आयुक्त सा. यांच्या आदेशाने आयुक्तालय ह्ददीत अंमली "ई सिगारेट (वेप)" पदार्थाची विक्री करणा-या इसमांची माहीती काढण्याकरीता पेट्रोलींग करीत असतांना आम्हास गुप्त बातमीदाराकडुन खात्रीशीर माहीती प्राप्त झाली की, टेक्सास कँम्प रोड या दुकानात अवैद्यरीत्या हुक्का साहीत्य तसेच " ई सिगारेट (वेप) " शासनाकडुन प्रतिबंधीत असेलेली तंबाखुयुक्त फ्लेवर्डसह हानीकारक पदार्थाची विक्री करीत आहे . अशी माहीती प्राप्त झाल्याने सदर ठिकाणी जावुन तेथील मालक नामे आशिष बाबाराव कड्ड वय 38 वर्ष रा. अर्जुन नगर अमरावती याच्या समक्ष दुकानाची पाहणी केली असता त्यांच्या दुकानातुन एकुन 55 नग वेगवेगळया कंपनीच्या इम्पोरटेड " ई सिगारेट (वेप) " कि.अ. 3,00,000/- रु. शासनाकडुन प्रतिबंधीत असेलेली तंबाखुयुक्त फ्लेवर्डसह मिळुन आल्याने सदरचा माल जप्त करण्यात आला. त्यास सदर शासनाकडुन प्रतिबंधीत असलेल्या इलेक्ट्रॉनिक सिगारेट बाबत विचारपुस केली असता त्याने उडवा उडवीची उत्तरे दिली . वरुन सदर इसमाने अवैद्यरीत्या शासनाने नागरिकांच्या तसेच लहान मुलांच्या आरोग्याच्या दृष्टीने बंदी घातलेल्या इलेक्ट्रॉनिक सिगारेट विक्री करीत असतांना मिळुन आल्याने त्याचे कृत्य कलम 223 बी.एन.एस. सह कलम 4,5,7,8 प्रोहीबीशन ऑफ इलेक्ट्रॉनिक सिगारेट अँक्ट 2019 अन्वये पो.स्टे. गाडगे नगर अमरावती येथे गुन्हा नोंद करण्यात आला.पुढे तपास सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा. श्री नविनचंद्र रेड्डी , पोलीस आयुक्त अमरावती शहर , श्री गणेश शिंदे, पोलीस उपायुक्त परि.2 अम. , श्रीमती कल्पना बारवकर , पोलीस उपायुक्त गुन्हे शाखा अम. , श्री शिवाजी बचाटे सहा. पो.आयुक्त , गुन्हे शाखा अम. पोलीस निरीक्षक ब्रम्हा गिरी पो.स्टे. गाडगे नगर यांच्या मार्गदर्शनात क्रिमीनल इंन्टेलीजन्स युनिट मधील प्रभारी स.पो.नि. महेन्द्र इंगळे ,स.पो.नि. मनोज मानकर ,स.फौ. विनय मोहोड , पो.हे.का.सुनिल लासुरकर , ना.पो.शि. अतुल संभे , पो.शि. राहुल ढेंगेकर, विनोद काटकर, निलेश जुनघरे , गजानन बरडे , सुशांत प्रधान यांनी केली आहे.